# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(१) ५२ (०७-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागाद्वारे चालविल्या जाणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या सोडविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी तत्कालीन आदिवासी विकास मंत्री यांचेसमवेत बैठकीचे आयोजन करण्याबाबत मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांच्या समस्या सोडविण्याकरीता बैठकीचे आयोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (३०-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागाच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांच्या प्रलंबित असलेल्या समस्या सोडविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक २३/०९/२०२४ रोजी व तद्नंतर तत्का.मंत्री (आ.वि.) यांचेसमवेत बैठक आयोजित करण्याबाबतचे निवेदन तसेच सूचना प्राप्त झालेल्या नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत स्थानिक अन्नधान्याचा समावेश करून शालेय पोषण आहारात सुधारणा करण्याबाबत

**(२) १३७ (२६-०३-२०२५) श्री.सत्यजीत तांबे, श्री.योगेश टिळेकर, श्री.राजहंस सिंह, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत**

**आसगावकर, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पोषण शक्ती शालेय पोषण आहार योजनेंतर्गत २ हजारांपेक्षा अधिक स्वयंपाकी व मदतनीस मध्यम भोजन शिजवण्याचे काम करीत असून या कर्मचाऱ्यांना केवळ ८३ रुपये रोजाने मानधन दिले जाते मात्र ते मानधन मागील तीन महिन्यांपासून मिळाले नाही, तसेच जळगाव जिल्ह्यातही प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत ६०८२ स्वयंपाकी व मदतनीस काम करीत असून ३ महिन्यांपासून मानधन देण्यात आले नसल्याने हे कर्मचारी आर्थिक संकटात सापडले असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहारात सुधारणा करून वैविध्यपूर्ण पोषक आहार देण्यात येणार असून प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत जिल्हा परिषद व प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून देण्यात येणाऱ्या अनुदानातून शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो मात्र त्यात अनेकदा अनियमितता झाल्याच्या तक्रारी आल्या असल्यामुळे ही योजना योग्य पध्दतीने राबविली जाते का याच्या तपासणीसाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने सन २०२१ ते २०२४ या काळातील शाळांच्या पोषण आहाराचे लेखा परीक्षण (ऑडिट) करण्याचा निर्णय घेतला असल्याने सदर निर्णयानुसार योजनेस पात्र शाळांना एका वेबफॉर्मद्वारे माहिती भरण्याचेही निर्देश देण्यात आले असून लेखा परीक्षणास माहिती सादर न करणाऱ्यास शाळाप्रमुखांकडून दंडात्मक तसेच प्रशासकीय कारवाई करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे येथील सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून राज्यातील योजनेंतर्गत पात्र सर्व शाळांचे लेखापरिक्षण (ऑडीट) करण्यात येणार असून आतापर्यंत किती शाळांकडून बँक पासबुक, कॅशबुकचा तपशील, तांदूळ साठा नोंद वही, उपयोगिता प्रमाणपत्र यांसह अन्य सर्व संबंधित बाबींची पूर्तता करण्यात आली आहे, तसेच प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेंतर्गत पोषण आहार शिजवून देणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन अपुरे असूनही सदर मानधन थकीत राहिले आहे तसेच या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे तोपर्यंत १५ हजार रुपये मानधन मिळावे, गणवेश देण्यात यावा, महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपनाची रजा मिळावी तसेच शालेय परिसर व स्वच्छतागृह साफसफाईची कामे करण्यासाठी दबाव आणू नये अशा मागण्यां संबंधित तहसिल कार्यालयावर माहे जानेवारी,२०२५ मध्ये मोर्चा काढून अथवा निवेदन देऊन शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित भागात पिकणारे स्थानिक अन्नधान्य जसे सोयाबीन, बेदाणे व खीरसाठी आवश्यक इतर पोषक जिन्नस यापासून तयार होणारे पदार्थ विद्यार्थ्यांना दिल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालास बाजारपेठ मिळेल तसेच विद्यार्थ्यांनाही पोषक आहार उपलब्ध होणार असल्याने स्थानिक अन्नधान्य, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतून खरेदी करण्याची मागणी विविध संघटना तसेच लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अद्यापपर्यंत किती शाळांनी वेब फॉर्मद्वारे ऑनलाईन माहिती भरली आहे तसेच ज्या शाळांनी वेब फॉर्मद्वारे ऑनलाईन माहिती भरली नाही त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याबाबत विविध संघटनांनी व लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने व स्वंयपाकी व मदतनीस यांचे थकित मानधन देण्याबाबत तसेच कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-०७-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना रुपये २५००/- प्रति महा असे मानधन वर्षातील १० महिन्यांसाठी देण्यात येते. यामध्ये केंद्र हिस्सा रुपये ६००/- व राज्य हिस्सा रुपये १९००/- असा आहे. सदर स्वयंपाकी तथा मदतनीस यांना सद्य:स्थितीत माहे जून, २०२५ अखेरपर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पात्र शाळांचे लेखापरिक्षण करण्यात येते. सदर योजनेंतर्गत पात्र शाळांचे सन २०२०-२४ या चार वर्षाच्या कालावधीतील नियमित लेखापरिक्षण करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील ६३,९३३ शाळांनी माहिती सादर केली आहे. तसेच, ३०,३२१ शाळांचे लेखापरिक्षण पूर्ण करण्यात आले आहे.
(४) होय, हे खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत केंद्र शासनाने प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्च मर्यादा निश्चित केली आहे. सदर आहार खर्च मर्यादेमध्ये विद्यार्थ्यांना केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आहार मानकाप्रमाणे आहार देणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक २८ जानेवारी, २०२५ अन्वये पाककृती निश्चित केल्या आहेत.
(५) सदर योजनेंतर्गत नियमित लेखापरिक्षणासाठी आवश्यक अभिलेखे विहित वेळेत सादर करण्याचे स्थायी आदेश आहेत. प्रस्तुत अभिलेखे विहित कालावधीत सादर करण्यासाठी दंडात्मक तसेच प्रशासकीय कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, आजरोजीपर्यंत कोणत्याही शाळाप्रमुखांवर सदरप्रमाणे कारवाई करण्यात आलेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुराबर्डी (जि.नागपूर) येथील गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालयाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३) ४०६ (०९-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले : दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक २३०७७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुराबर्डी (जि.नागपूर) या ग्रामीण भागात गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालयाला दिनांक १४ ऑक्टोबर,२०२४ रोजी शासनातर्फे प्रशासकीय मान्यता देऊन सदर प्रकल्पाकरीता १३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सांस्कृतिक संग्रहालय सुराबर्डी येथून स्थलांतरीत करुन पारशिवनी तालुक्यात

उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (२५-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.
दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये रुपये १३२१०.१२ लक्ष किंमतीच्या बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना अनुदान किंवा योजनेचा लाभ देताना ई-केवायसी पध्दत बंद करणेबाबत

**(४) ८९५ (०९-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांना कोणतेही शासकीय अनुदान किंवा इतर कोणत्याही योजनेचा लाभ मिळण्याकरीता ई-केवायसी करणे बंधनकारक असून केंद्र तसेच राज्य शासनाचे अनुदान, योजना किंवा अतिवृष्टी, पूर या सारख्या नुकसानीचे भरपाई मिळण्यासाठी वारंवार ई-केवायसी करावी लागत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन वारंवार ई-केवायसी करण्याबाबतची पध्दत बंद करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२०-०६-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे
(२) केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान योजनेच्या लाभासाठी भूमी अभिलेख नोंदीप्रमाणे डाटा अद्ययावत करणे ई-केवायसी प्रमाणिकरण व बँक खाती आधार संलग्न करणे या बाबी बंधनकारक केलेल्या आहेत. सबब, कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ पात्र लाभार्थीपर्यंत पोचवण्याचे दृष्टीने लाभधारकाची ओळख पटविणे अपरिहार्य आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत शेतकरी बांधवांना विनाशुल्क तसेच नाममात्र शुल्क आकारुन ई-केवायसी करण्याची सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिली आहे. असे प्रमाणीकरण एकदाच करावे लागते त्यामुळे ई-केवायसी करण्याची पध्दत बंद करणे शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## (जि.जळगाव) येथे बोदवड उपसा सिंचन योजनेसाठी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंत्याच्या नावे बनावट पावत्यांच्या आधारे वाळू उपसा करण्यात आल्याबाबत

**(५) ९१२ (०९-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात बोदवड उपसा सिंचन योजनेसाठी पाटबंधारे विभागाने सेवानिवृत्त कार्यकारी अभियंत्यांच्या नावाने घेतलेल्या वाळूच्या ठेक्यातून बनावट पावत्यांच्या आधारे वाळू उपसा करण्यात आल्याची बाब दिनांक २५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी असलेल्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१९-०६-२०२५) :** (१) व (२) सन २०१८-१९ मध्ये शासकीय कामासाठी (बोदवड उपसा सिंचन प्रकल्प) राखीव करण्यात आलेल्या वाळू गटामधून बनावट पावती पुस्तक तयार करुन शासनाची फसवणूक केल्याबाबत तक्रारी जिल्हाधिकारी, जळगाव कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारीमध्ये सेवानिवृत्त कार्यकारी अभियंत्यांच्या नावाने वाळू ठेका घेतल्याबाबत उल्लेख नाही. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, एरंडोल, जि.जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑक्टोंबर, २०२४ मध्ये त्रिस्तरीय चौकशी समिती स्थापन केली असून त्यानुषंगाने चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही

---

## कोकण पट्ट्यातील आंबा व काजु उत्पादक शेतकऱ्यांना मच्छिमारांप्रमाणे रॉकेल व डिझेल परतावा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) १२१८ (१४-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण पट्ट्यातील विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा उत्पादक तसेच काजू उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाने मच्छिमारांप्रमाणे रॉकेल व डिझेल परतावा देण्याची मागणी पालकमंत्री सिंधुदुर्ग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा तसेच काजू उत्पादक शेतकरी फवारणीसाठी लाखो रुपयाचे रॉकेल व डिझेल वापरत असून, फवारणी करण्यासाठीच्या मजुरीत तसेच औषधांच्या किंमतीतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतून मिळणारी रक्कमही माहे जानेवारी, २०१२ पासून बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत, मच्छिमारांप्रमाणे रॉकेल व डिझेल परतावा देण्यासाठी तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतून मिळणारी रक्कम लवकरात लवकर

मिळण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (०२-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
फवारणी करणे, मजुरी व औषधांच्या किंमतीत खूप वाढ होणे ही बाब खरी आहे. परंतु प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेकडून मिळणारी रक्कम माहे जानेवारी २०१२ पासून बंद आहे ही बाब खरी नाही.
(३) शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना रॉकेल व डिझेल परतावा देण्याकरीता शासनाकडे कोणतीही योजना अस्तित्वात नाही. तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत मिळणारी रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लाखांदूर जि.भंडारा येथील गडचिरोली जिल्ह्यात जाणाऱ्या समृद्धी महामार्ग बांधकामाला शेतकऱ्यांनी विरोध केल्याबाबत

**(७) १२७२ (१६-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्याच्या लाखांदूर तालुक्यातून गडचिरोली जिल्ह्यात जाणाऱ्या समृद्धी महामार्ग बांधकामाला लाखांदूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी विरोध केला असून दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शेतकऱ्यांनी तहसिल कार्यालयासमोर उपस्थित राहून विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाखांदूर तालुक्यातून भंडारा ते गडचिरोली दरम्यान शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग जात असून संबंधित विभागाच्या वतीने जमीन हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरू असून सदर शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहित करण्यापूर्वी शेतजमिनीला किती किंमत मिळणार आहे, हे अद्यापही शेतकऱ्यांना कळविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तहसिलदारांमार्फत मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला किती मिळणार याची माहिती देऊन त्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
दिनांक २१/०१/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, साकोली यांच्या उपस्थितीमध्ये संबंधित शेतकऱ्यांसोबत झालेल्या बैठकीमध्ये मोबदला निश्चितीची प्रक्रिया उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत संबंधितांना समजवण्यात आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.

(४) भूसंपादन अधिकारी साकोली यांचे अध्यक्षतेखाली भंडारा-गडचिरोली प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्गाचे अधिसुचनेवरील आक्षेपावर सुनावणी घेण्यात आली व शेतकऱ्यांना मोबदला निश्चितीची प्रक्रिया समजवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## म्हसळा (जि.रायगड) येथील मध्यवर्ती तहसिलदार कार्यालयाच्या इमारतीची डागडूजी व पुनर्निर्मिती करण्याबाबत

**(८) १३१४ (०९-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हसळा (जि.रायगड) येथील मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची इमारत जीर्ण झाली असून दिघी रोड येथे तहसिल कार्यालय स्थलांतरित करण्यात आल्याने शासकीय कामासाठी आलेल्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ०४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्याच्यादृष्टीने मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची नवीन इमारत उभारण्याबाबत किंवा जीर्ण इमारतीची डागडूजी करुन पुनर्निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१६-०६-२०२५) : (**१) हे अंशत: खरे आहे.
म्हसळा (जि.रायगड) येथील मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची इमारत जीर्ण झाली असून दिघी रोड येथे तहसिल कार्यालय स्थलांतरीत करण्यात आहे. परंतु नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होत नाही.
(२) म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची इमारत सन १९३०-१९३१ मधील असून ९३ वर्षे पूर्ण झालेली आहे. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट दिनांक ३०/११/२०२० रोजी झालेले असून सदर इमारत धोकादायक स्थितीत असून तांत्रिकदृष्टया कमकुवत झालेली आहे.
म्हसळा, जि.रायगड तालुक्यातील मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची नवीन इमारत बांधकामाकरीता जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयाकडून मुख्य अभियंता, यांच्या तांत्रिक मान्यतेसह अदयावत दरसूचीवर आधारीत परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला असून शासनास प्रस्ताव प्राप्त होताच कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भोसरी (ता.पिंपरी चिंचवड, जि.पुणे) येथील आद्योगिक वसाहतीतील कंपनीला लागलेल्या आगीत नुकसान भरपाई मिळणेबाबत कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत

**(९) १३५७ (२४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोसरी (पिंपरी चिंचवड) (जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीतील सेक्टर १० मध्ये ऋषी पॉली बॉण्ड या प्लास्टिक मोल्डिंग करणाऱ्या कंपनीला नुकत्याच लागलेल्या आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले

असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरात यापूर्वीही अनेक वेळा विविध कंपन्यांमध्ये आग लागण्याच्या घटना घडल्या असून अशा आगीच्या घटना वारंवार घडू नयेत तसेच या कंपनीला नुकसान भरपाई देण्याबाबत व कामगारांच्या सुरक्षेच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (२६-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

रिषी पॉलीमर्स प्रा.लि., सेक्टर नं.१०, भोसरी, पुणे या कारखान्यामध्ये दिनांक १२/०१/२०२५ रोजी आग लागली होती. या घटनेमध्ये कोणीही जखमी किंवा मृत पावलेली नाही. सदर आगीमध्ये कारखान्यातील कच्चा माल, यंत्रसामग्री, ऑफीस फर्निचर व इतर इलेक्ट्रीकल उपकरणे, कारखाना इमारत इ. सुमारे १.२५ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.
(२) पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरात सन २०२४ पासून आजपावेतो ३ आगीच्या घटना घडल्या आहेत. या सर्व घटनांची संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून अशा आगीच्या घटना वारंवार घडू नयेत यासाठी कारखाना भेटीदरम्यान कारखाना व्यवस्थापनास सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने महसूल वाढीसाठी मुद्रांक शुल्कात ५०० रुपयांची वाढ करण्यात आल्याबाबत

**(१०) १३९६ (१४-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने महसूल वाढीसाठी १०० आणि २०० रुपयांचे मुद्रांक बंद करून प्रतिज्ञापत्र, हक्क सोडपत्र, शैक्षणिक प्रक्रिया आणि विविध निराधार योजनेतील नावातील त्रुटी सुधारण्यासाठी ५०० रुपयांचा मुद्रांक केल्याची बाब माहे, ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुद्रांक शुल्क अधिनियमात झालेल्या बदलांमुळे राज्याच्या महसुलात वाढ होणार असली तरी सर्वसामान्य नागरिकांना ५०० रुपयांचा मुद्रांक खरेदी करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याने सदर शुल्क कमी करण्याबाबत शासनाला निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढीव मुद्रांक शुल्क कमी करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०२५) :** (१), (२) हे खरे नाही.
(३) शासन राजपत्र दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२४ नुसार महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसुची १ मधील अनुच्छेद क्र.४,५,८,९,२७,३०,३८,४४,४९,५०,५२, व ५८ या मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षीत

संलेखावरील शंभर रुपये किंवा दोनशे रुपये इतक्या नाममात्र रकमेतील दिर्घ काळापुर्वी निश्चित केलेल्या मुद्रांक शुल्काच्या दरात पाचशे रुपये इतकी वाढ करण्यात आलेली आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाने महसूल व वन विभागाकडील अधिसुचना क्रमांक मुद्रांक-२००४/१६३६/प्र.क्र.४३६/म-१, दिनांक ०१/०७/२००४ नुसार जात प्रमाणपत्र/ उत्पन्न प्रमाणपत्र/ वास्तव्य प्रमाणपत्र/ राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसुची १ मधील अनुच्छेद ४ अन्वये आकारण्यायोग्य असेलेले मुद्रांक शुल्क माफ करण्यात आलेले आहे. त्यामुळे नागरिकांना याकरीता मुद्रांक शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

सबब, शासकीय कार्यालयात सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅम्प पेपरची मागणी न करणेबाबत नोंदणी व महानिरीक्षक कार्यालयाचे पत्र जा.क्र.का.५/मुद्रांक-२४/सं.क्र.३०७/२०२४/८२२ दिनांक ३०/१०/२०२४ रोजी सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निर्देशीत करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## मौजे दिघोरी (मोठी)(ता.लाखांदूर,जि.भंडारा) येथील गोबरधन प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

**(११) १६६१ (२४-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दिघोरी (मोठी) (ता.लाखांदूर,जि.भंडारा) येथे शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या शेण आणि मलमूत्राच्या प्रक्रियेतून गॅस व वीज निर्मिती करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील एकमेव गोबरधन प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असतानाही जवळपास दीड वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटूनही प्रकल्पाचे काम सुरू झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्प अद्याप सुरू न होण्याची कारणे काय आहेत तसेच या प्रकल्पाला तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

मौजे दिघोरी (मोठी)(ता.लाखांदूर, जि.भंडारा) येथे शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या शेण आणि मलमुत्राच्या प्रक्रियेतून गॅस व वीज निर्मिती करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील एकमेव गोबरधन प्रकल्प सुरु झालेला आहे. सदर गोबरधन प्रकल्पामध्ये ३६ टन गोबरचा वापर करुन दिनांक ४/०३/२०२५ रोजी चाचणी घेण्यात आली आहे. चाचणी कालावधी मध्ये डोम मध्ये काही लिकेजेस आढळून आले असून त्याबाबत दुरुस्तीचे काम सुरु आहे. सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण क्षमतेने सुरु करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यात "सीओटू" उत्सर्जन कमी करणाऱ्या संकल्पनेच्या अंमलबाजवणीबाबत

**(१२) १७९५ (२९-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात "सीओटू" उत्सर्जन कमी करण्यासाठी सुमारे १ लाख एकर शेती सेंद्रिय व नैसर्गिक पिकांच्या लागवडीखाली आणण्याचे उद्दीष्ट वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना याद्वारे हवेतील सीओटूचे उत्सर्जन कमी करुन "कार्बन क्रेडिट" चा लाभ मिळवून देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संकल्पनेला एक वर्ष उलटूनही हवेतील सीओटूचे उत्सर्जन कमी करुन शेतकऱ्यांना "कार्बन क्रेडिट" चा लाभ मिळवून देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात माहिती घेऊन सदर संकल्पना अंमलात आणण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२०-०६-२०२५) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. वाशिम जिल्ह्याला एक लाख एकर शेती सेंद्रीय व नैसर्गिक पिकाच्या लागवडीखाली आणण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले नाही. शासनाच्या सेंद्रिय व नैसर्गिक शेतीच्या विविध योजनांमधून तयार झालेले शेतकरी गट व स्वेच्छेने सेंद्रिय नैसर्गिक शेती करणारे शेतकरी यांना कार्बन क्रेडीट मिळविण्यासाठी ऑरगॅनिक लेजर या खासगी कंपनीने शेतकरी गटांसमोर रब्बी-२०२४ मध्ये सदर संकल्पना मांडली होती. कार्बन क्रेडीट मिळविण्याच्या दृष्टीने सेंद्रिय व नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन व नोंदणीसाठी सहाय कृषी आयुक्तालयाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पणन महासंघाची आर्थिक परिस्थिती बिकट झाल्याबाबत

**(१३) १९३८ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य पणन महासंघाचे रूपये १२५ कोटी केंद्र शासनाने दिले नसल्याने आर्थिक परिस्थती बिकट झाल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कापूस खरेदीसाठी सीसीआयचा सब एजंट म्हणून पणन महासंघाची नियुक्ती यावर्षी केली नसल्याने कापूस खरेदी सूरू करण्यासाठी विलंब होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समस्या सोडविण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०३-०७-२०२५) :** (१) केंद्र शासनाचे मुख्य अभिकर्ता भारतीय कपास निगम (सीसीआय) व केंद्र शासनाने नियुक्ती केल्यास सीसीआय यांचे उप अभिकर्ता/सब एजंट म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यांच्यामार्फत राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून किमान हमी दराने कापूस खरेदी केली जाते. हमी दराने कापूस खरेदीमध्ये महासंघास झालेल्या तूटीची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून केली जात होती.

परंतु हंगाम २०१९-२० व २०२०-२१ मध्ये सीसीआय यांचे उप अभिकर्ता म्हणून राज्यात महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने हमी दराने केलेल्या कापूस खरेदीत झालेल्या नुकसान भरपाईचे व व्याज दर फरकाचे केंद्र शासनाकडून येणे असलेले रुपये १०१.७२ कोटी केंद्र शासनाकडून महासंघास प्राप्त झालेले नाही.

त्यामुळे वरील हंगामात खरेदी केलेल्या कापसाची रक्कम कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अदा करण्यासाठी महासंघाने राज्य शासनाच्या हमीवर बँकेकडून घेतलेल्या कर्जापैकी रुपये ८९ कोटी इतक्या कर्जाची परतफेड करणे महासंघास शक्य झाले नाही. कापूस पणन महासंघाचे बँक खाते एनपीए होऊ नये म्हणून महासंघाने सदर कर्जाचे मार्च २०२५ पर्यंत रुपये २५.२९ कोटी इतके व्याज भरले आहे.

(२) हे खरे नाही.

हंगाम २०२४-२५ मध्ये सीसीआयचे उप अभिकर्ता म्हणून कापूस पणन महासंघाची नियुक्ती करण्यात आलेली नसली तरी राज्यात किमान हमी दराने कापूस खरेदीच्या कार्यवाहीस विलंब झालेला नाही. मुख्य अभिकर्ता सीसीआय यांनी हंगामाच्या सुरुवातीला म्हणजे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२४ पासून राज्यात १२५ कापूस खरेदी केंद्रे सुरु करुन हमी दराने संपूर्ण हंगामात एकूण १४४.५५ लक्ष क्विंटल कापूस खरेदी केला आहे.

(३) केंद्र शासनाकडून कापूस पणन महासंघास येणे असलेल्या रक्कमेच्या प्रतिपूर्तीसाठी अपर मुख्य सचिव (सहकार व पणन) यांच्या दिनांक १४/०९/२०२३, दिनांक १०/११/२०२३ व दिनांक २८/०३/२०२४ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये सचिव, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांना विनंती करण्यात आली आहे. तसेच याबाबत तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री यांच्या दिनांक ०१/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मा.वस्त्रोद्योग मंत्री, भारत सरकार यांना विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

---

## शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) २२००४ (०४-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे : तारांकित प्रश्न क्रमांक १५७०६ ला दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, व्रणोपचारक व परिचर यासारखी महत्त्वाची पदे रिक्त असल्याने पशुपालकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व समस्या सोडवण्यासाठी रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे,
(२) शासन आदेश दिनांक २१/०२/२०२४ व दिनांक ०४/०३/२०२४ अन्वये एकूण २८९ पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पशुधन पर्यवेक्षकांची २५९ पदे आयुक्त पशुसंवर्धन यांच्या स्तरावरुन भरण्यात आली आहेत.
याशिवाय राज्यातील पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील २७९५ रिक्त पदे भरण्यासाठी तसेच सहायक आयुक्त पशुसंवर्धन संवर्गाची ३११ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहिराती प्रसिध्द केल्या आहेत. तसेच वर्ग ३ ची पदे भरण्यासाठी सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) विलंब नाही.

---

## राज्यातील बालगृहातील सज्ञान अनाथ मुलांकरीता सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्याबाबत

**(१५) २२७९८ (१९-०४-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बालगृहातून वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर बाहेर पडणाऱ्या सज्ञान युवक व युवतींना पुढील मार्गदर्शन करण्यासंदर्भात, त्यांच्या पुनर्वसनासंदर्भात शासनाकडून निश्चित धोरण नसल्यामुळे समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट होण्यासाठी स्वत:च्या पायावार उभे राहण्यासाठी या अनाथ मुलांना अनेक समस्या, अडचणी सोडविण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याची बाब सन २०१८ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनाथ मुलांना योग्य ते सहकार्य करण्याच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २ एप्रिल,२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिक्षण व नोकरीत १ टक्का समांतर आरक्षण उपलब्ध करून दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सज्ञान अनाथ मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, नोकरी यांबाबत येणाऱ्या अडचणी व समस्या यांचे निराकरण तसेच त्यांना योग्य त्या संधी व अधिकार मिळवून देण्याच्या अनुषंगाने अनाथ विकास महामंडळाची तातडीने स्थापना करण्याची, बालगृहातून बाहेर पडणाऱ्या व पुढील उच्च शिक्षण घेत असलेल्या अनाथ मुलांकरीता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी २५ खाटांचे अनुरक्षणगृह निर्माण करण्याची, अनाथ प्रमाणपत्र पडताळणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची तसेच बालगृहातील अनाथ मुलांची प्रलंबित असणारी अनाथ प्रमाणपत्रे वितरीत करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.महिला व बालविकास मंत्री महोदय यांचेकडे तसेच महात्मा फुले तसेच धर्मादाय अंतर्गत येणाऱ्या सर्व रूग्णांलयांमध्ये उपचाराकरीता आवश्यक असणाऱ्या रेशनकार्डऐवजी अनाथ प्रमाणपत्र ग्राह्य धरून त्याद्वारे अनाथ मुलांना सर्व वैद्यकीय सुविधांचा व उपाचाराचा लाभ देण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री महोदय यांचेकडे पत्राद्वारे लेखी विनंती केली आहे, हे ही खरे आहे

(४) असल्यास, स्वयंरोजगाराकरीता कौशल्य व स्वयंरोजगार विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व सवलती व योजनांचा लाभ पात्र व इच्छुक अनाथ मुलांना देण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.कौशल्य व स्वयंरोजगार मंत्री महोदय यांचेकडे तसेच ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण उत्पन्नातील १ टक्का निधी अनाथांसाठी राखीव ठेवण्याची तसेच अनाथ मुलांसाठी विशेष घरकुल योजना राबविण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.ग्रामविकास मंत्री महोदय यांचेकडे लेखी विनंती पत्राद्वारे केली आहे काय, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय असून शासन या प्रकरणी किती कालावधीत कार्यवाही करणार आहे ?

**कुमारी आदिती तटकरे (०१-०७-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे अंशतः खरे आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता या विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व सवलती व योजनांचा लाभ पात्र व इच्छुक अनाथ मुलांना देण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांचेमार्फत माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.मंत्री महोदय, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचेकडे करण्यात आलेली नाही.

ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण उत्पन्नातील १ टक्का निधी अनाथांसाठी राखीव ठेवण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा.ग्रामविकास मंत्री महोदय यांचेकडे केली आहे.

(५) राज्यामध्ये सध्या १ मुलींचे व ६ मुलांचे अनुरक्षण गृहे कार्यरत असून बाल न्याय अधिनियम,२०१५ नुसार काळजी व संरक्षणाची आवश्यकता असलेल्या परंतु, वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्याने बालगृहामधून बाहेर पडावे लागलेल्या मुला-मुलींना अनुरक्षण गृहांमध्ये मूलभूत सुविधा देण्यात येतात. सद्यःस्थितीत या अनुरक्षण गृहांची मंजूर प्रवेशित क्षमता ६५० इतकी असून त्यापैकी जवळपास ४७५ इतक्या जागा रिक्त आहेत.

राज्यामध्ये गरजू महिलांसाठी २२ महिला राज्यगृहे कार्यरत असून त्यांमध्येही १८ वर्षावरील अनाथ मुलींच्या वास्तव्याची व्यवस्था करण्यात येते.

अनाथ प्रमाणपत्र वितरणासंबंधित शासन निर्णय दिनांक ६ जुलै, २०२१ व शासन अधिसूचना दिनांक ६ जुलै, २०२४ अन्वये अनाथ प्रमाणपत्र पडताळणी संबंधित प्रथम व व्दितीय अपिल करण्यासंबंधित अपिल अधिकारी घोषित करण्यात आले आहे. तसेच सदर शासन अधिसूचनेन्वये अनाथ प्रमाणपत्र वितरणासंबंधित कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये शासकीय अनाथ आश्रमातील मुलांचा महात्मा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत समावेश करण्यात आला आहे. सदर योजनेचा लाभ देण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र ग्राह्य

धरण्यात येते व त्यानुसार लाभ देण्यात येतो.
मा.मंत्री, ग्रामविकास विभाग यांच्या दिनांक २३/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण उत्पन्नातील १ टक्का निधी अनाथांसाठी राखीव ठेवणे शक्य होणार नाही, असे मा.लोकप्रतिनिधी यांना कळविण्यात आले आहे.

---

## भटक्या विमुक्त आश्रम शाळांमध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत

**(१६) २३४३६ (२२-०७-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भटक्या विमुक्त समाजातील वंचित घटकातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या आश्रम शाळेमध्ये सन २०१२ पासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भरती झाली नसल्याने अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रलंबित भरती प्रक्रिया कधीपासून सुरू होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०२-०७-२०२५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
सन २०१२ नंतरच्या कालावधीत विजाभज आश्रमशाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन होणे आवश्यक असल्याने, नव्याने भरती प्रक्रिया करण्यात आलेली नव्हती. त्यानंतर समायोजनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर अतिरिक्त कर्मचारी नसल्याने, विजाभज आश्रमशाळेतील संच मान्यतेनुसार रिक्त असलेली शिक्षक / शिक्षकेतर पद भरतीस शासन मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेळी मेंढीपालकांच्या उन्नतीसाठी शेळी मेंढीला विमा आणि चरण्यासाठी चरई क्षेत्र व चारा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) २३५२८ (०८-०८-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेळी मेंढीपालकांच्या उन्नतीसाठी सन १९७८ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळाचे भाग भांडवल रुपये २५ कोटीवरून रुपये ९९ कोटी ९९ लाख इतके करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याची बाब माहे मार्च २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निर्णयानुसार सदर महामंडळास शासनाकडून आतापर्यंत किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,
(३) तसेच शेळी व मेंढी पालन व्यवसाय करणाऱ्या नागरिकांच्या शेळी, मेंढयांकरीता विमा, चरई क्षेत्र व

चारा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच प्राप्त निधीतून शेळी मेंढीपालकांच्या उन्नतीसाठी महामंडळाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०६-२०२५) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळास मंजूर करण्यात आलेल्या भागभांडवलाचा संपूर्ण निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) महामंडळामार्फत शेळी व मेंढी पालकांच्या उन्नतीसाठी

१. राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेंतर्गत २० मेंढया +१ मेंढानर असा मेंढीगट वाटप, सुधारित प्रजातीचे नर मेंढयांचे वाटप, संतुलित खाद्य उपलब्ध करणे, कुटटी केलेल्या हिरव्या चाऱ्याच्या मुरघास बनविण्यासाठी गासड्या बांधण्याचे यंत्र, पशुखाद्य कारखाने उभारणे याबाबींकरीता अर्थसहाय्य देण्यात येत आहे. यासाठी ५० ते ७५ टक्के अनुदान देण्यात येते. याशिवाय वर्षातील ४ महिन्यांसाठी चराई अनुदान, जागा खरेदीसाठी अनुदान व कुक्कुट पक्षी वाटप योजना राबविण्यात येत आहे.

उपरोक्त योजनांशिवाय भागभांडवलातून प्रक्षेत्रांचे बळकटीकरण करण्यासाठी पशुधन खरेदी, कृत्रिम रेतन साहित्य, प्रक्षेत्रावरील पशुधनासाठी चारा उत्पादन, खाद्य कारखाना, प्रशिक्षण केंद्र, शेड उभारणी व अनुषंगीक यंत्रसामुग्री खरेदी करणे इ. बाबींवर भांडवली खर्च करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) येथे कारागृहाच्या अपुऱ्या जागेमुळे आरोपींना कारागृहात ने आण करण्यात पोलिसांना अडचणी येत असल्याबाबत

**(१८) २३६४५ (२२-०७-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १७२०३ ला दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ६० कारागृहे असून त्यामध्ये २६ हजार ३७७ कैदी ठेवण्याची क्षमता असून प्रत्यक्षात तेथे ४०४८५ म्हणजे सुमारे १५३ टक्के कारागृहात अधिकृत बंदीक्षमतेपेक्षा अधिक बंदी बंदीस्त असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अलिबाग शहराच्या सुमारे दहा किलोमीटर परिसरात अलिबाग पोलीस ठाण्याची हद्द असून तेथे शेकडो गुन्ह्यांची नोंद होते, सदर गुन्ह्यांची उकल करताना अटक केलेल्या आरोपींना कारागृहात ठेवावे लागत असल्याने अलिबाग पोलीस ठाण्याच्या कारागृहाच्या अपुऱ्या जागेमुळे अलिबाग पोलिसांवर आरोपींना मांडवा सागरी किंवा रेवदंडा पोलीस ठाण्याच्या कारागृहात ठेवावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अलिबाग पोलीस ठाण्याला लागून मागील बाजूला असलेल्या कारागृहाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याने तसेच तेथे आवश्यक सोयीसुविधांचा अभाव असल्याने सदर कारागृह शहरातील कोषागार विभागाच्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात अतिरिक्त कैदी कारागृहात असल्यामुळे कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेवर कामाचा ताण कमी करण्यासाठी तसेच अलिबाग शहरात वाढत्या लोकसंख्येसोबत वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन अलिबाग व राज्यात सुसज्ज असे कारागृह उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२६-०४-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात एकूण ६० कारागृहे असून त्यांची अधिकृत बंदीक्षमता २७ हजार १९४ इतकी आहे. तथापि, सद्य:स्थितीत प्रत्यक्ष ४१०८९ एवढे म्हणजे सुमारे १५१ टक्के अधिक बंदी मार्च २०२४ अखेरीस कारागृहात बंदीस्त आहेत.

(२) व (३) अलिबाग पोलीस ठाणे आवारात असलेल्या लॉकअपची इमारत मोडकळीस आली असल्याने सन २०१२ सालापासून बंद करण्यात आलेली आहे. त्या नंतर कोषागार विभागाच्या इमारती मध्ये दोन खोल्या आरोपी लॉकअप करीता वापरण्यात येत होत्या. परंतु, त्यांना दुरुस्तीचे काम करावयाचे असल्याने त्यांनी सदरच्या खोल्या रिक्त करण्यास सांगितल्याने सन २०१५ पासून अलिबाग पोलीस ठाणेकडील आरोपी ठेवण्याकरीता कारागृह (लॉकअप) उपलब्ध नसल्याने मांडवा पोलीस ठाणे येथे आरोपी ठेवण्यात येतात.

(४) मौजे परहूर ता.अलिबाग जि.रायगड येथे नवीन कारागृह बांधण्याकरीता ०४.६६ हे. आर (११ एकर २६ आर) जागा जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचेकडून देण्यात आली असून सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह यांचे नाव आहे. जागेची मोजणी व सीमा निश्चित करून ताबा घेणेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

नारायणडोह (जि.अहमदनगर), व पालघर :- येथे उपलब्ध जागेवर अनुक्रमे ५०० व १५०० बंदीक्षमतेचे नवीन कारागृह बांधण्याचे प्रस्तावित असून, शासन निर्णय दिनांक ०५/१२/२०२३ अन्वये सदर कारागृहांच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. नारायणडोह (जि.अहमदनगर) व पालघर मध्यवर्ती कारागृहाच्या प्रकल्पाची निविदा प्रसिध्द करण्यात आली असून पालघर मध्यवर्ती कारागृहाचे प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे.

बारामती जि.पुणे :- येथे १३० बंदीक्षमता असलेले नवीन जिल्हा कारागृह वर्ग-२ चे बांधकाम सुरु करण्यात आले आहे.

मौ. बासंबा, जि.हिंगोली येथे ५०० बंदीक्षमता, मौ. कारंजा, जि.गोंदिया येथे -२९९ बंदीक्षमता, नांदेड येथे-५०० बंदीक्षमता, खेडी शिवार, भुसावळ, जि.जळगाव येथे-३४९ बंदीक्षमतेचे नवीन कारागृह बांधण्यासाठी जागा प्राप्त झाली आहे. तसेच या कारागृहांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करण्यात आली असून नकाशे व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील अस्तित्वातील जागेवर ३००० बंदीक्षमतेचे कारागृह व येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे अस्तित्वातील जागेवर प्रत्येकी ४०६४ बंदीक्षमतेची दोन नवीन कारागृहे बांधण्याचे प्रस्तावित आहे. या दोन्ही कारागृहांकरीता तसेच तुर्भे, मुंबई येथे १००० बंदी क्षमतेच्या नवीन कारागृहांसाठी, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांचेकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली आहे.

मौ. अदवसन, जि.नांदेड :- येथे नवीन कारागृह बांधणे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत ग्राम रोजगार सेवकांना प्रलंबित वेतनात तसेच मानधनात वाढ करण्याबाबत

**(१९) २४०८७ (१८-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात रोजगार हमी योजनेद्वारे मजुरावर देखरेख ठेवणे, अहवाल सांभाळणे व दस्तऐवज अद्ययावत ठेवण्यासाठी गाव स्तरावर ग्राम रोजगार सेवकाची नियुक्ती करण्यात आली असून दीर्घ काळापासून ग्राम रोजगार सेवकांना अत्यल्प व तुटपुंजे मिळणारे मानधन चार महिन्यांपासून थकीत असल्याची बाब माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या थकीत मानधनामुळे ग्राम रोजगार सेवकांसह त्यांच्या कुटुंबियांची उपासमार होत असल्याने त्यांना मानधन देण्याबाबत तसेच त्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राम रोजगार सेवकांना प्रलंबित वेतन अदा करणे तसेच मानधनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (२७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
ग्रामरोजगार सहाय्यक यांना एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत मानधन अदा करण्यात आलेले आहे.
(२) व (३)
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण पातळीवर कार्यरत ग्रामरोजगार सहाय्यक यांना प्रतिमाह रुपये ८०००/- सुधारित मानधन व इतर अनुषंगिक भत्ते देण्यासंदर्भात दिनांक ०३/१०/२०२४ रोजी शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगिक अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची बाब विभागाकडून कार्यवाहीत आहे.
शासनाच्या दिनांक ३१/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये ग्रामरोजगार सहाय्यकांना प्रचलित पध्दतीने मानधन अदा करण्याच्या सूचना आयुक्त कार्यालय, नागपूर यांना दिल्या असून त्यानुसार मानधन अदा करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीने गुंवणुकदारांची कोटयवधी रुपयांची फसवणुक केल्याबाबत

**(२०) २४२१७ (०५-०९-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीने ६२८ गुंतवणुकदारांची रुपये ५७९ कोटींची फसवणुक केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीमध्ये इतर देशातील अनिवासी भारतीयांनी सुध्दा गुंतवणुक केली असून कंपनीच्या मालकांनी तक्रार दाखल करण्याच्या एक दिवस अगोदर पलायन केले असून तपास करताना रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीचे मालक अनेक देशांचे परदेशी सीमकार्ड वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीचे मालक श्री.अंबर दलाल यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांची बँक खाती गोठविण्याबरोबर त्यांची मालमत्ता जप्त करुन गुंतवणुकदारांचे पैसे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मे. रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या माध्यमातून आरोपीमार्फत साधारणतः २००० गुंतवणूकदारांची अंदाजे एकूण ५५९ कोटींची फसवणूक झाल्याप्रकरणी ओशिवारा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३४७/२०२४ भादंवि कलम ४२०, ४०६ व ४०९ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई शहर येथे वर्ग करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या तपासामध्ये अनिवासी भारतीयांनी गुंतवणूक केलेबाबत आढळून आले आहे. तसेच कंपनीचे मालक विदेशी सिमकार्ड वापरत असल्याचेही तपासात आढळून आले आहे. कंपनीच्या मालकाने दिनांक १४/०३/२०२४ रोजी पलायन केले होते. तथापि, दिनांक २६/०३/२०२४ रोजी त्यास उत्तराखंड येथून अटक करण्यात आली असून दिनांक ०८/०४/२०२४ पासून तो न्यायालयीन कोठडीत आहे व प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे. आत्तापर्यंतच्या तपासात वित्तीय संस्था, आरोपी व त्याचे कुटुंबिय यांची ४२ बँक खाती, ८ स्थावर मालमत्ता, ४ वाहने व इतर जंगम मालमत्ता संरक्षित करण्यात आलेल्या आहेत.
रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या वित्तीय संस्थेची आणि संस्थेचा मालक तसेच इतर संबंधित यांची मालमत्ता जप्त करुन सदर मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्याकरीता सक्षम प्राधिकारी नेमणुकीबाबत एमपीआयडी कायद्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.